कार्यकारी सारांश

DRI आधारित इंटिग्रेटेड स्टिल प्लांट प्रकल्पाची स्थापना ज्यामध्ये 0.5 MTPA क्षमतेचे TMT रिबार्स ज्यामध्ये 0.825 MTPA क्षमतेचे DRI उत्पादन (4 × 625 TPD DRI किल्न्स), स्टिल निर्मिती सुविधा (7 × 25T इंडक्शन फर्नेसेस, 2 × 25T LRFs, 2 × 2–स्ट्रँड (6/11 मी. त्रिज्या) CCMs, 30 TPH RHF) ज्याद्वारे 0.521 MTPA बिलेट्सचे उत्पादन केले जाईल, TMT रिबार मिलद्वारे 0.5 MTPA TMT रिबार्सचे उत्पादन, स्लॅग क्रशर (वाळू निर्मितीसाठी – 100,000 TPA) आणि 125 MW क्षमतेची कॅप्टिव्ह पॉवर जनरेशन (75 MW WHRB + 50 MW AFBC) प्रकल्पाचा स्थापनेचा प्रस्ताव

सर्वे नं. 72–143, 274, 280–281, 283 MIDC गाव मुधोली चक क्र. 1

तालुका चामोर्शी, जिल्ह्य गडचिरोली, महाराष्ट्र

प्रकल्प प्रवर्तक

मेसर्स सॅफरॉन हिल मेटल्स प्रायव्हेट लिमिटेड

पर्यावरणीय सल्लागार

पोल्यूशन एण्ड इकॉलॉजी कन्ट्रोल सर्विसेस (PECS)

धंतोली पोलिस स्टेशन जवळ, धंतोली, नागपूर, महाराष्ट्र

Email: pecsnagpur@gmail.com

Accreditation no.: NABET/EIA/25-28/RA 0474 Valid upto: 16th October 2028

कार्यकारी सारांश


1.0 प्रस्तावना व प्रकल्पाचा तपशिल

मेसर्स सॅफरॉन हिल मेटल्स प्रायव्हेट लिमिटेड (SHMPL) ह्यांनी सर्वे क्रमांक 72–143, 274, 280–281, 283 MIDC येथिल गाव मुधोली चक क्र. 1 तालुका चामोर्शी, जिल्ह्य गडचिरोली, महाराष्ट्र राज्य येथे DRI आधारित इंटिग्रेटेड स्टिल प्लांट प्रकल्पाची स्थापना करण्याचे प्रस्तावित केले आहे. या प्रकल्पात 0.5 MTPA क्षमतेचे TMT रिबार्स ज्यामध्ये 0.825 MTPA क्षमतेचे DRI उत्पादन (4 × 625 TPD DRI किल्न्स), स्टिल निर्मिती सुविधा (7 × 25T इंडक्शन फर्नेसेस, 2 × 25T LRFs, 2 × 2–स्ट्रँड (6/11 मी. त्रिज्या) CCMs, 30 TPH RHF) ज्याद्वारे 0.521 MTPA बिलेट्सचे उत्पादन केले जाईल, TMT रिबार मिलद्वारे 0.5 MTPA TMT रिबार्सचे उत्पादन, स्लॅग क्रशर (वाळू निर्मितीसाठी – 100,000 TPA) आणि 125 MW क्षमतेची कॅप्टिव्ह पॉवर जनरेशन (75 MW WHRB + 50 MW AFBC) यांचा समावेश राहिल.

प्रस्तावित प्रकल्पासाठी एकूण 78.24 हे. जमीन आवश्यक आहे. ही जमीन MIDC द्वारे ''पास–थ्रु'' (Pass Through) पद्धतीचा वापर करून संपादित केली जाईल आणि संबंधित रक्कम प्राप्त झाल्यानंतर ती मेसर्स सॅफरॉन हिल मेटल्स प्रायव्हेट लिमिटेड (SHMPL) कडे हस्तांतरित केली जाईल. प्रकल्पासाठी निश्चित केलेल्या प्रकल्प क्षेत्रात कोणत्याही वन जमिनीचा समावेश नाही.


MoEF&CC च्या 14 सप्टेंबर 2006 च्या EIA अधिसूचना व त्यातील दुरूस्ती नुसार प्रस्तावित प्रकल्प अनुसूची 3 (a) धातु कारखाना (फेरो व नॉनफेरो) आणि 1(d): "थर्मल पॉवर प्लांट", अंतर्गत येतो.

मेसर्स सॅफरॉन हिल मेटल्स प्रायव्हेट लिमिटेडने प्रस्तावित ''ग्रीनफील्ड'' प्रकल्पासाठी पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (EIA) केले आहे आणि योग्य पर्यावरण व्यवस्थापन योजना तयार केली आहे.



स्त्रोत: *Survey of India (SOI) Toposheet*

टोपोग्राफिकल नकाशा (10 किमी त्रिज्या)



प्रकल्प लेआऊट नकाशा

प्रकल्प विवरण

<table>
<tr><th>अनु क्र</th><th>विवरण</th><th>उत्पादनाची महिती</th></tr>
<tr><td>1.</td><td>प्रकल्पाची उत्पादन क्षमता</td><td>
<table>
<tr><th>अनु क्र</th><th>उत्पादनाचे नाव</th><th>प्लांट कॉन्फिगरेशन</th><th>उत्पादन क्षमता</th></tr>
<tr><td>1.</td><td>स्पॉन्ज आयरन</td><td>DRI प्लांट (4X625 TPD)</td><td>8,25,000 TPA (0.8 MTPA)</td></tr>
<tr><td>2.</td><td>M.S बिलेट</td><td>• इंडक्शन फर्नेस (7X25 T)
• 2 x 25 T Ladle Refining furnace
• 2X2 स्ट्रँड्स (6/11 M Radius) - Continuous Casting Machine (CCM)</td><td>5,20,833 TPA</td></tr>
<tr><td>3.</td><td>TMT रिबार्स</td><td>रिबार रोलिंग मिल
• 1 x 30 TPH Standby RHF</td><td>5,00,000 TPA</td></tr>
<tr><td rowspan="2">4.</td><td rowspan="2">पॉवर जनरेशन</td><td>AFBC Boiler</td><td>50 MW</td></tr>
<tr><td>WHRB</td><td>75 MW</td></tr>
<tr><td>5.</td><td>स्लॅग क्रशर (वाळू निर्मितीसाठी)</td><td>-</td><td>1,00,000 TPA</td></tr>
<tr><td colspan="4">वाळू निर्मितीसाठी 1,00,000 TPA क्षमतेचा स्लॅग क्रशर बसवण्याचा प्रस्ताव आहे. इंडक्शन फर्नेसद्वारे 74,382 TPA इतका स्लॅग अंतर्गतरीत्या निर्माण होईल त्यातील आयरन कण वेगळे केल्यानंतर उरलेला स्लॅग वाळू निर्मितीसाठी वापरला जाईल. गडचिरोली जिल्ह्यात अनेक स्टिल उद्योग प्रस्तावित असल्याने, वाळू निर्मितीसाठी लागणारा उर्वरित स्लॅग जिल्ह्यातील इतर स्टिल प्रकल्पांमधून मिळवला जाईल. तोपर्यंत, वाळूचे उत्पादन 1,00,000 TPA पेक्षा कमी राहील.</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>2.</td><td>प्रकल्प स्थळ</td><td>सर्वे क्रमांक 72–143, 274, 280–281, 283 MIDC अंतर्गत गाव मुधोली चक क्र. 1 तालुका चामोर्शी, जिल्ह्य गडचिरोली, महाराष्ट्र</td></tr>
<tr><td>3.</td><td>कच्च्या मालाचे विवरण</td><td>DRI किल्न - पेलेट, कोल, डोलोमाइट
इंडक्शन फर्नेस - DRI, पिग आयर्न, पूर्वस्थितीतील स्क्रॅप</td></tr>
</table>


		कॅप्टिव पॉवर प्लांट – चार, स्टिम कोल आणि DRI पासून निघणारी वेस्ट हिट कॅप्टिव पॉवर प्लांटसाठी
4.	प्रस्तावित प्रकल्पा करिता पाण्याची आवश्यकता आणि स्त्रोत	प्रस्तावित प्रकल्पाकरिता पाण्याची आवश्यकता 6009 KLD आहे. पाण्याचे स्त्रोत हे वैनगंगा नदी आहे जी प्रकल्प क्षेत्रापासून 2.70 किमी (प.द.प.) अंतरावर आहे.
5.	वीजेची आवश्यकता आणि स्त्रोत	प्रस्तावित प्रकल्पाकरिता एकुण वीजेची आवश्यकता 95 MW आहे आणि ज्याचे स्त्रोत स्वतःच्या कॅप्टिव पॉवर प्लांट हे राहील.
6.	जमीनीची आवश्यक	78.24 हे. / 193.37 एकड
7.	हरित पट्टा विकास	19.56 हे. (एकुण जमिनिच्या 25 % टक्के) (29 ऑक्टोबर 2025 रोजीच्या सुधारित कार्यालयीन ज्ञापनानुसार.)
8.	मनुष्यबळ	918-950
9.	पर्यावरणीय घटक	i) वायु प्रदूषण नियंत्रण ii) जल प्रदूषण नियंत्रण iii) ध्वनि प्रदूषण नियंत्रण iv) घनकचरा व्यवस्थापन
10.	प्रकल्पाची एकुण किमत	रू. 1615 कोटी
11.	पर्यावरण व्यवस्थापन योजने करिता रक्कम	भांडवली मुल्य : रू..163 कोटी आवर्ती मुल्य : रू. 19.7 कोटी

2.0 प्रक्रिया वर्णन

सर्वप्रथम, पेलेट्स, कोळसा आणि डोलोमाइट यांसारख्या कच्च्या मालावर DRI तयार करण्यासाठी DRI किल्न्समध्ये प्रक्रिया केली जाते. या DRI चा, पिग आयर्न आणि रिव्हर्ट स्क्रॅपसह, इंडक्शन फर्नेसमध्ये वापर करून गरम द्रव स्टिल तयार केले जाते. हे स्टिल, फेरो–अलॉयज आणि चुना यांसारख्या फ्लक्ससह, नंतर लॅडल रिफायनिंग फर्नेसमध्ये पाठवले जाते. येथे, गंधक आणि फॉस्फरस काढून टाकून द्रव स्टिल शुद्ध केले जाते. हे शुद्ध केलेले द्रव स्टिल इंडक्शन हीटर आणि री–हीटिंग फर्नेसमध्ये हस्तांतरित केले जाते, जिथे बिलेट्स तयार केले जातात. हे बिलेट्स नंतर TMT रिबार मिलमध्ये पाठवले जातात, जिथे या बिलेट्सना साच्यात घालून अंतिम उत्पादन म्हणजेच

TMT रिबार तयार केले जातात. या संपूर्ण प्रक्रियेत, वेस्ट हिट आणि कोळसा यांसारखी उप–उत्पादने तयार होतात, जी अनुक्रमे WHRB आणि AFBC मध्ये, आणि नंतर या वेस्ट हिटचा वापर करून कॅप्टिव–निर्मित वीज तयार करण्यासाठी TG मध्ये पाठवली जातात.

TMT रिबार्सची उत्पादन प्रक्रिया खाली दिलेल्या फ्लोचार्ट मध्ये दर्शविली आहे.



आकृती : उत्पादन प्रक्रिया प्रवाह तक्ता

3.0 पर्यावरणाचे पायाभूत वर्णन

वायु पर्यावरण

प्रस्तावित प्रकल्प स्थळाच्या सभोवतालच्या 10 कि.मी. परिसरात पायाभूत पर्यावरणीय निरीक्षण 1 ऑक्टोबर 2025 ते 31 डिसेंबर 2025 या तीन महिन्यांच्या कालावधीत (मान्सूनोत्तर हंगामात) करण्यात आले. परिवेशी वायुची दिशा उ.पू. (NE) होती. परिवेशी

वायुची दिशेच्या आधारे निवडलेल्या 10 ठिकाणी परिवेशीय वायुच्या गुणवत्तेचे निरीक्षण करण्यात आले, जी खालील श्रेणीत नोंदविण्यात आली.

PM_{10}	-	40.2 to 68.9 µg/m³
$PM_{2.5}$	-	16.4 to 31.3 µg/m³
SO_2	-	8.6 to 21.2 µg/m³
NOx	-	12.4 to 32.0 µg/m³

PM_{10}, $PM_{2.5}$, SO2, व NOx ची तिव्रता राष्ट्रीय परिवेशी गुणवत्ते च्या प्रमाणाच्या आत (NAAQ) आढळली.

जल पर्यावरण

8 भुपृष्ठजल व 8 भुजलाचे असे एकुण 16 नमुने गोळा करून विश्लेषण करण्यात आले. पाण्याच्या नमुन्याचे विश्लेषण, पाणी व सांडपाण्याची विश्लेषण पद्धती, अमेरिकन पब्लिक हेल्थ असोशिएशन (APHA) पब्लिकेशन च्या प्रमाणित पध्दतीच्या अनुसार करण्यात आले. माहितीनुसार असे निदर्शनास आले की भुजल तसेच भूपृष्ठजलाची गुणवत्ता हि पिण्याकरिता कोलीफॉर्म वगळून (BIS 10500-2012) ने निर्धारित केलेल्या अनुसंबंधित प्रमाणांच्या आत होती.

ध्वनी पर्यावरण

प्रस्तावित प्रकल्पामध्ये सर्व आठ निरिक्षण स्थळांवर दिवसाला 45.98 dB(A) ते 49.85 dB (A) आणि 40.01 dB(A) ते 44.0 dB(A) च्या श्रेणीत ध्वनीची पातळी नोंदविण्यात आली दिवसा ध्वनीची मात्रा जास्त आढळुन आली कारण अधिकांश कामे ही दिवसाच्या वेळी केली जातात. .

सर्व आठ ठिकाणी ध्वनीची पातळी राष्ट्रीय परिवेशी ध्वनी पातळी मानक जी पर्यावरण व वन मंत्रालया च्या राजपत्राच्या अधिसुचनेनूसार रहिवासी क्षेत्रा : 55.0 dB(A) व औद्योगिक क्षेत्र : 75.0 dB(A) या प्रमाणे मर्यादेत आढळून आली.

मृदा पर्यावरण

प्रस्तावित प्रकल्प क्षेत्राच्या सभेवतातील परिसरातील सद्याच्या मृदा अवस्थेतील मातीचे भौतिक–रासायनिक गुणवैशिष्ट्यांचे मुल्यांकन करण्याकरिता अभ्यास क्षेत्रातील निवड केलेल्या स्थळांवर मृदाचे आठ नमुने संकलित करून विश्लेषित करण्यात आले. अभ्यास क्षेत्रातील मृदा सुपीक, क्षारमुक्त आणि पर्यावरणीयदृष्ट्या स्वच्छ असून, ती शेतीसाठी उत्तम क्षमता राखते. येथील मुख्य मर्यादा म्हणजे सेंद्रिय कर्बाचे मध्यम प्रमाण आणि फॉस्फरसची तुलनेने कमी पातळी योग्य मृदा व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करून यात सुधारणा करता येऊ शकते.

जैवविविध पर्यावरण

प्रकल्प स्थळाच्या 10 किमी परिसरातील जैविक अभ्यासात सद्याच्या पर्यावरणमध्ये वनस्पती व प्राण्यांचे मुल्यांकन करण्याकरिता पायाभूत अभ्यास करण्यरत आला ज्यामध्ये सर्वेक्षण दरम्यान केलेल्या अभ्यासा द्वारे 151 स्थलीय वनस्पती प्रजातींची नोंद करण्यात आली, यामध्ये 76 वृक्ष, 18 झुडपे, 43 वनऔषधी व इतर लहान वनस्पती (herbs) व वेली, 12 गवती व बांबूच्या प्रजाती आणि 2 कृषी पिकांचा समावेश आहे. अभ्यास क्षेत्रात कोणतेही धोक्यात असलेलेए दुर्मिळ किंवा संरक्षित प्राणी प्रजातींची नोंद नाही. प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षण आणि वन व्यवस्थापन आराखडा व इतर संबंधित साहित्यातील दुय्यम माहितीच्या आधारे एकूण 268 प्राणी प्रजातींची नोंद करण्यात आली आहे. यापैकी 33सस्तन प्राणी, 138 (पक्षी), 21 सरपटणारे प्राणी (सरीसृप), 24 मासे, 44 अपृष्ठवंशी प्राणी आणि 8 उभयचर प्राणी आहेत. 2023 रोजी अद्ययावत केलेल्या वन्यजीव संरक्षण कायदा 1972 नुसार, 31 प्राणी प्रजाती अनुसूची– I या श्रेणीत येतात.

संवर्धन योजनेसाठी 2.00 कोटी रुपयांचे प्रस्तावित बजेट आहे. हे निधी राज्य वन आणि वन्यजीव विभागाकडे जमा केले जातील, ज्याद्वारे 5 वर्षांच्या कालावधीत संरक्षित क्षेत्रांमध्ये (बफर झोनमधील राखीव वनांसह) विविध उपक्रम राबवले जातील. याव्यतिरिक्त, मृदा आणि आर्द्रता संवर्धन उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी रू 70.0 कोटी ची तरतूद करण्यात आली आहे.

सामाजिक आर्थिक पर्यावरण

प्रकल्प क्षेत्रात मध्यम सामाजिक–आर्थिक स्थिती असलेली वैविध्यपूर्ण ग्रामीण लोकसंख्या राहते. सॅफरॉन हिल मेटल्स प्रायव्हेट लिमिटेडश (ग्रीनफील्ड) प्रकल्पासाठी CER अर्थसंकल्प, EIA (पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन), SIA (सामाजिक प्रभाव मूल्यांकन) सार्वजनिक सल्लामसलत आणि आधारभूत पर्यावरणीय मूल्यांकनाद्वारे निश्चित केलेल्या गरजांच्या आधारे तयार केला जाईल. यामध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळी, स्वच्छता, आरोग्यसेवा, पर्यावरणीय जागरूकता, हरितपट्टा विकास, अक्षय ऊर्जा आणि समुदायासाठी पर्यावरणीय पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याला प्राधान्य दिले जाईल. आधारभूत देखरेखीच्या अंतर्गत केलेल्या सामाजिक–आर्थिक सर्वेक्षणाच्या आधारे, परिसरातील गावांच्या विकासासाठी सुमारे 17 कोटी रुपये खर्च केले जातील.

4.0 संभावय पर्यावरणीय प्रभाव व नियंत्रण उपाय

वायु गुणवत्तेवर प्रभाव

- स्टॅक उत्सर्जनाद्वारे वातावरणात कणयुक्त पदार्थ, NOx, SOx आणि इतर प्रदूषक निघू शकतात, ज्यामुळे वायुच्या गुणवत्तेवर परिणाम होतो आणि श्वसनाच्या समस्या निर्माण होऊ शकतात.
- कच्च्या मालाची हाताळणी, क्रशिंग, स्क्रीनिंग आणि साठ्यमधून निघणाऱ्या उत्सर्जनामुळे धूळ प्रदूषण, दृश्यमानता कमी होणे आणि कामगार आणि जवळच्या समुदायांच्या आरोग्यवर परिणाम हाऊ शकतो.

नियंत्रणाचे उपाय

- कणयुक्त वायु प्रदूषणाला नियंत्रित करण्याकरिता DRI व CPP युनिटमधे ESPs ची स्थापना करण्यात येईल .
- वायु प्रदूषणाला नियंत्रित करण्याकरिता IF युनिटमधे बॅग फिल्टर लावण्यात येईल..
- CPCB मानंकानुसार चिमनीची उंची ठेवण्यात यंईल.

- नियमित पाणी फवारणी, धूळ कमी करण्याची प्रणाली आणि आवरण असलेले कन्व्हेयर वापरून फ्यूजिटिव उत्सर्जन नियंत्रित केले जाईल.
- मुख्य चिमनीवर सतत उत्सर्जन देखरेख प्रणाली (CEMS) स्थापित केल्या जाईल

ध्वनी पातळीवर प्रभाव आणि नियंत्रण उपाय

प्रक्रिया दरम्यान, स्क्रॅप मेटल हाताळणी, रोलिंग मिल, कूलिंग फॅन, मोटर्स, पंप इत्यादीं हे प्रमुख ध्वनी निर्माण करणारे स्रोत राहतील ज्यामुळे परिसरामध्ये ध्वनीची वाढ होऊन प्लांटमध्ये काम करणाऱ्या कामगारांवर परिणाम होऊ शकते.

प्रकल्पस्थळावर निर्माण होणारा ध्वनि केवळ ध्वनि निर्माण करणाऱ्या प्लांटपुरताच मर्यादित राहील, त्यामुळे परिसरावर होणारा ध्वनिचा परिणाम नगण्य असेल. उपकरणामध्ये ध्वनी नियंत्रण इन–बिल्ट असेल, ध्वनी उपकरणांना आवरण केले जाईल. इयरप्लग पुरविण्यात येतील. कंपन आयसोलेटर बसवले जातील आणि CPCB निर्धारित पालन सुनिश्चित पणे केले जाईल..

पाण्यावर होणारे प्रभाव आणि नियंत्रण उपाय

कंपनी ''शून्य–द्रवविरहित निस्सारन संकल्पना'' चा अवलंब करेल. त्यामुळे पाण्यावर कोणताही परिणाम होणार नाही. भूजलचा वापर कंपनीच्या कामाकरिता करण्यात येणार नाही

घनकचरा निर्मिती

घनकचरा निर्मिती आणि त्याचे व्यवस्थापन खालील तक्यात दिले आहे

अनु क्र.	घनकचरा	मात्रा (TPA)	विल्हेवाट लावण्याची पध्दत
स्पॉन्ज आयरन प्लांट (4x625 TPD)			
1.	चार	1,65,000	स्वतःच्या प्रकल्पात विजनिर्मिती मध्ये वापरण्यात येईल
2.	ॲश	90,000	जवळपासच्या सिमेंट प्लांट व विटांच्या उत्पादन करणाऱ्यांना विकण्यात येईल.

3.	ESP पासून निर्मित डस्ट	37,125	याचा वापर विटांच्या उत्पादनासाठी आणि जमीन भरण भरण्याकरिता
इंडक्शन फर्नेस आणि रोलिंग मिल			
1.	IF स्लॅग	74,382	IF स्लॅग, स्लॅग क्रशिंग युनिटद्वारे क्रश केला जाईल आणि त्यातून मिळणारे आर्यनचे कण इंडक्शन फर्नेसमध्ये वापरले जातील. उरलेल्या क्रश केलेल्या स्लॅगवर वाळू तयार करण्यासाठी प्रक्रिया केली जाईल.
2.	रिटर्न स्क्रॅप	31,785	एण्ड कटींग स्टिल मेल्टींग शॉपमध्ये चार्ज केले जाते
पॉवर प्लांट			
1.	ॲश	1,10,555	जवळच्या सिमेंट कारखान्याला आणि विटांच्या निर्मिती युनिटला विकले जाईल

सामाजिक आर्थिक पर्यावरणावर प्रभाव

मेसर्स सॅफरॉन हिल मेटल्स प्रायव्हेट लिमिटेड मध्ये 918–950 प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होईल व शैक्षणिक पात्रता आणि तांत्रिक क्षमतेनुसार रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. सामाजिक परिणाम अनुकूल ठेवण्यासाठी, कंपनी स्थानिकांशी नियमित संवाद साधण्यात सामाजिक कल्याणकारी उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थानिक लोकांचा व अधिका-यांशी समन्वय ठेवेल.

5.0 पर्यावरणीय निरिक्षण कार्यक्रम

पर्यावरणीय निरिक्षण म्हणजे, पर्यावरणीय घटकांचे निरीक्षण आणि अभ्यास करण्यासाठी वायु, जल, माती, जैविक पर्यावरण यांचे पद्धतशीर नमुने घेणे हे राहिल. पर्यावरणीय निरिक्षणासाठी स्वीकारलेल्या पद्धती CPCB मार्गदर्शक तत्त्वांनुसार आहेत. प्रकल्पानंतरच्या पर्यावरणीय निरिक्षण कार्यक्रमाचा उद्देश अंमलात आणलेल्या प्रदूषण नियंत्रण उपायांच्या क्षमतेचे मूल्यांकन करणे आणि स्थापित प्रदूषण नियंत्रण प्रणाली चे नियमित तपासणी करणे हे राहील.

6.0 अतिरिक्त अभ्यास

MoEF&CC द्वारे जारी केलेले ToR मुद्दांनुसार अतिरिक्त अभ्यास म्हणजे जनसुनावणी जोखिम मुल्यांकन व आपत्ति व्यवस्थापन योजना ही आहे की ती ड्राफ्ट EIA अहवालात

समाविष्ट करण्यात आली आहे जनसुनावनी मध्ये उपस्थित मुद्दे व त्याचे निराकरण अंदाजपत्रकासह अंतिम EIA रिपोर्ट मध्ये समाविष्ट करण्यात येईल.

7.0 प्रकल्पाचे फायदे

प्रस्तावित प्रकल्पामुळे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊन स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. प्रकल्पामध्ये रोजगार उपलब्ध करून देताना स्थानिक रहिवाशांना प्राधान्य दिले जाईल. तसेच, परिसरातील गावांमध्ये विविध सामाजिक व आर्थिक विकास उपक्रम राबविण्यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात येईल

8.0 पर्यावरण व्यवस्थापन योजना

प्रस्तावित प्रकल्पाचा एकूण खर्च रू. 1615 कोटी आहे. यामध्ये पर्यावरण व्यवस्थापन खर्चासाठी रू.163 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, आवर्ती खर्च रू.19.7 कोटी इतका आहे.

9.0 हरितपट्ट्याचा विकास

प्रकल्पाच्या क्षेत्रात पर्याप्त वृक्षारोपण आणि हरित पट्टा विकसित केला जाईल. 78.24 हे. जमिनीवर हा हरित पट्टा विकसित केला जाईल. 19.56 हे. (25%) जागा हरित पट्ट्या करिता वापरण्यात येईल. प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना लक्षात घेऊन हे केले जात आहे. प्रस्तावित प्रकल्पात प्रति हे 2500 या प्रमाणे एकूण 48,900 झाडे लावली जातील.

निष्कर्ष

वरील चर्चेवरून हे स्पष्ट होते की, प्रस्तावित प्रकल्पामुळे परिसरावर कोणताही लक्षणीय परिणाम होण्याची शक्यता नाही. योग्य प्रतिबंधात्मक उपाययोजना अंमलात आणून सर्व निकष विहित मानकांनुसार राखण्यात येतील.